नियमित फौजदारी खटला क्र. १७/२०२२

निशाण क्र. २७

सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संजना राजेंद्र ताम्हणकर

वय – ३६ वर्षे, धंदा – गृहिणी

निवासस्थान – गढीताम्हाणे रहाटेश्वर, ता. देवगड जि. सिंधुदूर्ग.

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पाकजादे यांचेमार्फत–**

१. सन २०२२ मध्ये मध्ये रहाटेश्वर चर्मकारवाडी येथे राहत होते. मी, माझे पती, सासू व तीन मुले राहत होतो. दि. २६/०२/२०२२ रोजी सकाळी ८.३० वा. माझ्या रहात्या घरी घटना घडली. त्यावेळी आम्ही सर्वजण घरात होतो. त्यावेळी अरुण ताम्हणकर व आनंद ताम्हणकर हे आमच्या घराच्या अंगणात येवून आम्हाला शिवीगाळ करु लागले. ते आम्हाला बाहेर या, तुम्हाला काय ते दाखवितो असे बोलत होते. मी घरातून बाहेर आले व काय झाले असे त्यांना विचारले. त्यांनी शिवीगाळ करुन दवाजावर लाकडी दांडयाने मारले. माझ्या हाताला लाकडी दांडे लागले. त्यावेळी मी ओरडले त्यावेळी माझे पती राजेंद्र घराबाहेर आले. त्यांच्याशी देखील आरोपींनी भांडण केले व आरोपी आनंद याने लाकडाच्या दांडयाने माझ्या पतीला मारले. त्यावेळी काशिनाथ ताम्हणकर व अरुण काशिनाथ ताम्हणकर यांनी माझ्या पतीला बाहेर खेचून घेतले, त्यांची पॅन्ट फाडली, त्यांच्या हातावर लाकडी दांडयाने मारले. त्यानंतर माझी सासू व मुले घरातून बाहेर आली. सरिता ताम्हणकर हिने माझी सासू संपत्ती यांना केसाला धरुन ओढून मारले. त्यानंतर आम्ही देवगड पोलीस स्टेशनला गेलो. तेथून आम्हाला सरकारी हॉस्पीटल येथे पाठविले. तेथे उपचार घेवून पुन्हा देवगड पोलीस स्टेशनला गेलो. तेथे तक्रार नोंदविली. आता मला दि. २६/०२/२०२२ रोजीची फिर्याद दाखविली. ती तीच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाण क्र. २८** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकते. आनंद ताम्हणकर, अरुण, काशिनाथ हे हजर आहेत. सरीता ताम्हणकर यांना पाहिल्यास मी ओळखू शकते. घटनेतील दांडे दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला जप्त मुद्देमालातील दोन लाकडी दांडे दाखविले. ते तेच आहेत. त्यास एकत्रीत अर्टीकल – अ देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.के.के.मराठे यांचेमार्फत सुरु.</u>

२. हे खरे नाही की, आम्ही दि. २६/०२/२०२२ रोजी मी, राजेंद्र ताम्हणकर, संपत्ती ताम्हणकर, वेदीका राजेंद्र ताम्हणकर, सचिन बाळकृष्ण ताम्हणकर, गायत्री गुरुनाथ कुडाळकर असे सर्व पोलीस स्टेशनला गेलो होतो. हे खरे आहे की, या सर्वांची तपास टिप्पणे दि. २६/०२/२०२२ रोजी नोंदविली होती. हे खरे आहे की, त्यानंतर पोलीसांनी पंचनामा करावा लागेल असे सांगितले होते. हे खरे आहे की, आमच्याकडे आमच्या विश्वासातील दोन पंच मागितले व ते दोन आम्ही गावात जावून पंचनामा केला. हे खरे आहे की, पंचापैकी बाळकृष्ण धोंडू ताम्हणकर हे आमचे नातेवाईक असून इम्रान साटविलकर हे आमचे परिचित आहेत. हे खरे आहे की, यामधील साक्षीदार म्हणून गायत्री, राजेंद्र, वेदिका व सचिन यांची नावे साक्षीदार म्हणून घ्यावीत म्हणून मी पोलीसांना विनंती केली होती.हे खरे आहे की, हे सर्व दि. २६ तारखेला गावात एकत्र उपलब्ध होते म्हणून त्यांची साक्षीदार म्हणून घ्यावे असे मी सुचविले होते. हे खरे आहे की, या सर्वांची इच्छा माझ्या बाजूने केसचा निकाल व्हावा व आरोपींना शिक्षा व्हावी अशी इच्छा होती. अर्टीकल – अ दोन दांडे पंचनाम्यावेळी पोलीसांनी जप्त केले होते. हा पंचनामा आमच्यासोबत दि. २६ तारखेला केला होता तो तोच आहे. हे खरे आहे की, पोलीसांनी त्यावेळीच मुद्देमालावर लेबले लावली होती.

३. हे खरे आहे की, घटनेपुर्वी त्याच दिवशी सकाळी आमच्या गोठयाभोवती लाकडी दांडयाचे कुंपण पाडण्याच्या कारणावरुन आरोपी व आमच्यामध्ये वाद झाले होते. हे खरे आहे की, त्यामध्ये आरोपींनी आम्हाला आमच्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार देणार असल्याची धमकी दिली होती. हे खरे नाही की, जेव्हा पंचनाम्यासाठी पोलीस आले होते तेव्हा त्या लाकडांपैकी कुंपणातील दोन लाकडे घेतली होती. हे खरे आहे की, मुद्देमालातील लाकडांप्रमाणे गोठयाभोवती लाकडाचे कुंपण होते. हे खरे नाही की, त्यावेळी पोलीस आम्हाला लाकडाची व्यवस्था करावी लागेल असे सांगत होते. हे खरे नाही की, अर्टीकल अ चे दांडे पोलीसांनी सोईस्कर होते म्हणून निवडले.

४. माझे पती तलाठी कार्यालयात कोतवाल म्हणून काम करतात. हे खरे आहे की, त्यामुळे सरकारी अधिकारी व पोलीस यांच्यासोबत नेहमी उठबस असते. हे खरे नाही की, माझ्या पतीने त्याची पोलीसांसोबत असलेली ओळख वापरून ही फिर्याद

दिली.घटनेनंतर दोन ते अडीच तासांनी आम्ही देवगड पोलीस स्टेशनला पोहचलो. हे खरे आहे की, सकाळी ११.०० च्या सुमारास आम्ही पोलीस स्टेशनला पोचलो होतो. आम्ही त्यावेळी अर्धातास पोलीस स्टेशनमध्ये होतो. सरकारी दवाखान्यात १० मिनिटात डॉक्टर भेटले होते. माझी व माझ्या पतीची वैदयकिय तपासणी अध्र्या ते पाऊण तासात पुर्ण झाली होती. माझ्या तपासणीला वेळ झाला व त्यानंतर माझ्या पतीची वैदयकिय तपासणी केली असे काही घडले नाही. सरतपासामध्ये मला कुठे कुठे जखमा झाल्या हे सांगण्यास मला काही अडचण नव्हती. माझ्या सासूला देखील दुखापत झाली होती असे माझे म्हणणे आहे. सासूला दवाखान्यात नेले नव्हते. पोलीसांना सासूच्या जखमा दिसल्या होत्या. पोलीसांनी त्यांची वैदयकिय तपासणी करण्यास सांगितले होते. पोलीसांनी सांगूनही सासूची वैदयकिय तपासणी न करण्याचे कारण फिर्यादीत दिले नाही. त्यांची तपासणी करण्यास काही अडचण नव्हती.

५. हे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, त्यामुळे आम्ही सासूची तपासणी केली नाही. चारही आरोपींच्या हातात दांडे होते असे माझे म्हणणे आहे. पोलीसांना किती दांडे दाखविले होते हे मला आठवत नाही. पोलीस चार दांडे घेवून गेले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. हे खरे आहे की, सरतपासात सांगितलेल्या जखमेशिवाय इतर कोणतीही जखम मला किंवा माझ्या पतीला झाली नव्हती. हे खरे आहे की, डॉक्टारांनी माझी व माझ्या पतीची एकच जखम तपासली होती. शिवीगाळी नक्की कोणत्या प्रकारे केली हे सांगण्यास मला काही अडचण नव्हती.

६. हे खरे नाही की, आरोपी आमच्या घरासमोर अंगणात आले, व शिवीगाळ केली हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, आरोपींनी शिवीगाळ करुन दवाजावर लाकडी दांडयाने मारले, माझ्या हाताला लाकडी दांडे लागले, त्यावेळी मी ओरडले त्यावेळी माझे पती राजेंद्र घराबाहेर आले, त्यांच्याशी देखील आरोपींनी भांडण केले व आरोपी आनंद याने लाकडाच्या दांडयाने माझ्या पतीला मारले, त्यावेळी काशिनाथ ताम्हणकर व अरुण काशिनाथ ताम्हणकर यांनी माझ्या पतीला बाहेर खेचून घेतले, त्यांची पॅन्ट फाडली, त्यांच्या हातावर लाकडी दांडयाने मारले, त्यानंतर माझी सासू व मुले घरातून बाहेर आली,

सरिता ताम्हणकर हिने माझी सासू संपत्ती यांना केसाला धरुन ओढून मारले हे मी खोटे सांगत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे)

दि. २३/११/२०२३

न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड